# भूमिगत स्थानकांच्या डोक्यावर ३००० झाडे

म. टा. खास प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या स्थानकांच्यावरील जमिनीवर तीन हजार झाडे लावली जाणार आहेत. त्यासाठी ही मेट्रो मार्गिका उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) पुढाकार घेतला आहे. उभारणीदरम्यान प्रभावित झालेल्या झाडांच्या जागीच हे रोपण केले जात आहे.

मेट्रो ३ ही मार्गिका मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडते. उत्तरेकडे सारिपूतनगर (आरे) ते दक्षिणेकडे कफ परेड, अशी ही २६ स्थानकांची मार्गिका आहे. मार्गिकेचा जवळपास १५ किलोमीटरचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३पासून सुरू होणार आहे. त्यामध्ये आरे ते बीकेसी उत्तर (प्राप्तिकर कार्यालय), अशा दहा स्थानकांचा समावेश असेल. या टप्प्याचे काम ८५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. भुयारीकरण १०० टक्के झाले असून स्थानकांची उभारणीही ९५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाली आहे. यामुळेच आता स्थानकांच्या बाहेर (जमिनीवर) विविध विकासकामे व सुशोभीकरण 'एमएमआरसी'ने हाती घेतले आहे. त्याची सुरूवात वृक्षारोपणापासून झाली.

## राज्यभरातील नर्सरींचा समावेश

मेट्रो स्थानकांच्या डोक्यावर रोपण होत असलेली ही झाडे राज्यभरातील नर्सरींमध्ये वाढवण्यात आलेली आहेत. पहिल्या टप्प्यात देशी बदाम, पांगरा यासारख्या १७ प्रकारच्या १०८५ झाडांचा समावेश असेल. एकूण ३ हजार झाडांची सर्व २६ स्थानकांच्यावर रोपणी होणार आहे.

'एमएमआरसी'नुसार, जमिनीखाली ही स्थानके बांधताना खोदकामासाठी जमिनीवरील झाडांची कापणी करावी लागली होती. अशी जवळपास ३ हजार झाडे प्रभावित झाली होती. ज्या ठिकाणी आधीची झाडे होती, त्याच ठिकाणी आता नव्याने झाडांची पेरणी सुरू करण्यात आली आहे. याची सुरुवात सिप्झ स्थानकापासून अलिकडेच झाली. प्रत्येकी १८ इंचाचा घेर असलेल्या नऊ झाडांचे रोपण तेथे 'एमएमआरसीएल'च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय अश्विनी भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. अशी ३ हजारहून अधिक झाडांची या मार्गिकेवरील विविध भूमिगत स्थानकांच्यावर रोपण केले जात आहे.